# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# पुणे विभागीय मंडळ,पुणे–411 005.

क्रमांक पुविमं/माध्यमिक/क/कलागुण/7292
पुणे–411005.
दिनांक– 07/12/2022.

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
पुणे/अहमदनगर/सोलापूर

विषय–माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च ,2024 शास्त्रीय कला,चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत....

संदर्भ–1.शासन निर्णय क्र.संकीर्ण–2016/प्र.क्र.202/एस.डी.–2 दिनांक–24 नोव्हेंबर, 2017.
2..शासन निर्णय क्र.संकीर्ण–8219/प्र.क्र.286/सां.का.4 दिनांक–10 डिसेंबर, 2019.
3.क्र.रा.मं./परीक्षा–7/6711 पुणे दिनांक–12/12/2022.

उपरोक्त विषय व शासन संदर्भाधीन पत्रानूसार सर्व मान्यताप्राप्त शाळांना कळविण्यात येते की, शास्त्रीय कला (नृत्य/गायन/वादन),चित्रकला या क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षेमध्ये शासनाने कळविल्याप्रमाणे खालील नमूद केलेल्या सर्व अटी पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचे परिपूर्ण प्रस्ताव शाळेकडून प्रपत्र,परिशिष्ट अ आणि ब व हमीपत्रासह भरुन संबंधित संस्थेच्या सही व शिक्क्यासह सादर केलेल्या (गुणपत्रिकेच्या प्रमाणित प्रतीसह) प्रस्तावाचा विचार करून पात्र विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

**सदर शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रकार यामध्ये भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मंगळवार दिनांक 16 जानेवारी 2024 पर्यंत समक्ष मंडळ कार्यालयात सादर करावेत. पोस्टाने पाठविण्यात येवू नयेत. तसेच सदर प्रस्ताव सादर करतांना विद्यार्थ्याच्या बैठक क्रमांकानुसारच किंवा आवेदनपत्र क्रमांकानुसारच सादर करावेत आणि प्रत्येक पानावर पृष्ठ क्रमांक टाकण्यात यावा.**

**अ) शास्त्रीय कला (नृत्य/गायन/वादन) करिता विद्यार्थ्यांनी खालील निकष/कागदपत्र/अटी पूर्ण केलेल्या असाव्यात.**

**1. शास्त्रीय नृत्य,गायन व वादन यामध्ये ज्या विद्यार्थ्याने मान्यताप्राप्त संस्थेच्या सलग एक ते तीन (3) परीक्षा अथवा एक ते पाच (5) परीक्षा दिलेल्या प्रमाणपत्र व गुणपत्रिकांच्या प्रमाणित छायाप्रती सादर करणे बंधनकारक आहे.(उदा.1.प्रारभिक, 2.प्रवेशिका प्रथम, 3. प्रवेशिका पूर्ण, 4.मध्यमा प्रथम, 5. मध्यमा पूर्ण ) या व्यतिरिक्त पुढील परीक्षांच्या गुणपत्रिकांच्या छायांकित प्रती प्रस्तावासोबत जोडण्यात येवू नयेत.**

सलग गुणपत्रिका सादर न केलेल्या विद्यार्थ्यांना सदर गुणांची सवलत दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.संबधित शाळेतील शिक्षकांनी/लिपिकांनी सदर शासन निर्णयात आदेशित केल्यानुसार चित्रकला/शास्त्रीय कला (नृत्य/गायन/वादन) परीक्षानिहाय गुणपत्रिकांच्या छायांकित प्रमाणित प्रती प्रस्तावांसोबत सादर करण्यात याव्यात. परिपूर्ण असलेल्या प्रस्तावास खालील तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार अतिरिक्त गुणांची सवलत दिली जाईल.

| गुण | ग्रेड | कमाल गुण | |
|---|---|---|---|
| | | 3 री परीक्षा | 5 वी परीक्षा |
| 75% व त्यापेक्षा जास्त | A+ | 10 | 15 |
| 65% व त्यापेक्षा जास्त आणि 75% पेक्षा कमी | A | | |
| 55% व त्यापेक्षा जास्त आणि 65% पेक्षा कमी | B+ | 07 | 10 |
| 45% व त्यापेक्षा जास्त आणि 55% पेक्षा कमी | B | 05 | 05 |
| 45 %पेक्षा कमी | C | 03 | 03 |

2. पाश्चात्य नृत्याकरिता सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यात येणार नाहीत.
3. शास्त्रीय कला क्षेत्रातील विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण देण्यासाठी ग्राहय धरण्यात येईल.

4. विद्यार्थ्याने मान्यताप्राप्त संस्थांनी आयोजित केलेल्या 3 री किंवा 5 वी परीक्षा विद्यार्थी इ.7 वी (सन 2020–2021), इ.8 वी (सन 2021–2022), इ.9 वी (सन 2022–2023) अथवा इ. 10 वी मध्ये (सन 2023–2024) असताना उत्तीर्ण केलेली असावी. तसेच विद्यार्थ्याने उत्तीर्ण केलेल्या परीक्षाप्रमाणे त्याला अतिरिक्त गुण देण्याची व त्याप्रमाणे मंडळास कळविण्याची जबाबदारी संबंधित शाळाप्रमुखांची राहील.

**5. कला क्षेत्रातील 3 री व 5 वी परीक्षा एकाचवेळी देणारे विद्यार्थी सवलतीचे गुण देण्यासाठी पात्र ठरणार नाहीत.**

**6 विद्यार्थ्यांकडून शाळेने परिपूर्ण प्रस्तावच स्विकारावेत. अपूर्ण प्रस्ताव संबधित शाळेने स्विकारू नयेत.तसेच मंडळ कार्यालयाकडे पाठवू नयेत. मंडळाकडे परिपूर्ण प्रस्तावच सादर करावेत. तसेच नावात तफावत असलेले प्रस्ताव मंडळाकडे पाववू नयेत ते अपात्र करण्यात येतील.अपूर्ण प्रस्ताव सादर केल्यास त्याबाबत कुठलीही त्रुटी मंडळाकडून पत्राद्वारे कळविली जाणार नाही.याची गांभिर्याने नोंद घ्यावी.**

याबाबत विद्यार्थी सवलतीच्या गुणांपासून वंचित राहिल्यास विद्यार्थ्याच्या झालेल्या नुकसानीस संबंधित शाळा जबाबदार राहील.

7.कलेचे प्रस्ताव सादर करताना दोन वेगवेगळया संस्थांचे गुणपत्रक सादर केल्यास सदर दोन्ही संस्थांनी परिशिष्ट अ सादर करणे आवश्यक आहे. तसेच दोन्ही संस्था शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या असणे आवश्यक आहे. दोन संस्थामधून परीक्षा दिलेल्या असल्यास 3 री / 5 वी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या संस्थेने अधिच्या अन्य संस्थाकडील (शासन निर्णयास नमूद असलेल्या ) प्रमाणपत्र प्रमाणित करणे आवश्यक आहे.

ब) लोककला

1. इ. 7 वी ,इ. 8 वी, इ. 9 वी व इ. 10 वी या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यास प्रयोगात्मक लोककला प्रकारातील सादरीकरणाबाबत खालीलप्रमाणे अतिरिक्त गुण देण्यात येतील.

| प्रयोगाची संख्या | अतिरिक्त गुण |
|---|---|
| 25 पेक्षा जास्त व 50 पेक्षा कमी | 05 |
| 50 व त्यापेक्षा जास्त | 10 |

2. इ. 7 वी ,इ. 8 वी, इ. 9 वी व इ. 10 वी या शैक्षणिक वर्षात राज्य शासनातर्फे राज्यस्तरावर घेण्यात येणाऱ्या बालनाटय स्पर्धेत वैयक्तिक प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे अतिरिक्त गुण देण्यात येतील.

| कमांक | अतिरिक्त गुण |
|---|---|
| प्रथम (सुवर्ण पदक ) | 15 |
| द्वितीय (रौप्य पदक ) | 10 |
| तृतीय (कास्य पदक ) | 05 |

राज्य शासनातर्फे घेण्यात येणाऱ्या बालनाटय स्पर्धेत विभागस्तरावर वैयक्तिक प्रथम कमांक(सुवर्ण पदक ) मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास 05 अतिरिक्त गुण देण्यात येतील.

3.चित्रपटासाठी राष्ट्रीय स्तरावरील अभिनय पुरस्कार (वैयक्तिक ) प्राप्त होणाऱ्या बालकलाकारास 10 अतिरिक्त गुण देण्यात येतील. तसेच चित्रपटासाठी राज्य स्तरावर प्रस्तूत पुरस्कार (वैयक्तिक) प्राप्त होणाऱ्या बालकलाकारास 05 अतिरिक्त गुण देण्यात येतील.

क) चित्रकला

1.इंटरमिजीट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेतील ग्रेड A प्राप्त विद्यार्थ्यांना 07 गुण, ग्रेड B प्राप्त विद्यार्थ्यांना 05 गुण, व ग्रेड C प्राप्त विद्यार्थ्यांना 03 गुण देण्यात येतील.

2. चित्रकला प्रस्ताव सादर करताना परिशिष्ट ब, इलिमिंटरी व इंटरमिजीट ड्रॉईंग प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती याप्रमाणे प्रस्तावासोबत सादर करण्यात याव्यात.

3.सदर चित्रकलेचे प्रस्ताव सादर करताना संबधित चित्रकला शिक्षक /संबधित लिपीक यांनी आवेदनपत्रातील नाव व चित्रकला प्रमाणपत्रातील नावात फरक असल्यास निर्धारित ठरवून दिलेल्या दिनांकापर्यतच दुरूस्तीचे प्रमाणपत्र (इलिमिंटरी व इंटरमिजीट) प्रमाणपत्र व प्रस्ताव मंडळाकडे सादर करावेत. नावात फरक असलेले प्रस्ताव व प्रमाणपत्र मंडळाकडे सादर केल्यास याबाबत कुठल्याही प्रकारची त्रुटी कळविली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

4. विद्यार्थी इलिमिंटरी परीक्षा उत्तीर्ण असल्याशिवाय इंटरमिजीट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेचे गुण मिळणार नाहीत.

5. इ.10 वीच्या नियमित परीक्षेसाठी प्रविष्ठ होणारा कोणताही विद्यार्थी (फॉर्म नं.17 सहित) या सवलतीच्या

अतिरिक्त गुणांसाठी पात्र राहील.**शास्त्रीय कला (नृत्य/गायन/वादन), व चित्रकला प्रस्ताव एकत्रित सादर न करता वेगवेगळे सादर करावेत.**

एखादा विद्यार्थी क्रीडा,शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेतील सहभाग यापैकी एकापेक्षा जास्त क्षेत्रात प्राविण्य प्राप्तकर्ता असला तरी , कोणत्याही एकाच क्षेत्रासाठी सवलतीचे अतिरिक्त गुण जे उच्चतम आहेत ते घेण्यासाठी अर्ज करू शकतो.

उपरोक्त शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी सदर शासन निर्णयाचे अवलोकन करून त्यामध्ये सूचित केल्याप्रमाणे कार्यवाही करावी. सन 2024 मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी सवलतीचे अतिरिक्त गुण मिळणेबाबतचे पात्र विद्यार्थ्यांचे परिपूर्ण प्रस्ताव शाळांनी **मंगळवार दिनांक 16 जानेवारी,2024 पर्यंत मंडळ कार्यालयाकडे समक्ष सादर करावेत.सदर प्रस्ताव पोस्टाने पाठविण्यात येवू नयेत. पोस्टाने प्राप्त प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.**

**सदर कला/चित्रकला प्रस्तावासोबत संबधित कला/चित्रकला शिक्षक व मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीने सोबत जोडण्यात आलेले प्रपत्र, परिशिष्ट अ , आणि ब व हमीपत्र मंडळास सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.तसेच संदर्भ क .3 द्वारे कळविल्यानुसार कला,चित्रकला व लोककलेच्या प्रस्तावासोबतच छाननी शुल्क रूपये 25/–प्रति विद्यार्थी याप्रमाणे चलनाद्वारे वा रोखीने मंडळ कार्यालयास निर्धारित मुदतीत सादर करणे अनिवार्य आहे. त्याशिवाय प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी.**

सदर प्रस्ताव वरील दिनांकास सादर करण्याचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संबधितांची राहील.संबधित संस्थेने विद्यार्थ्यास मुळ प्रमाणपत्र संस्थेच्या सही शिक्क्यासह दोन प्रतीमध्ये द्यावेत. संबधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर विद्यार्थ्यास पोहोच द्यावी. विद्यार्थ्याने प्रमाणपत्राची एक प्रत शाळेत मुख्याध्यापकांकडे जमा करून पोहोच घेवून संस्थेत पोहोच जमा करावी. संस्थेने विद्यार्थ्यास सोबतच्या परिशिष्ट–अ नमुन्यामध्येच प्रमाणपत्र द्यावे. चित्रकलेबाबतचे प्रमाणपत्र सोबतच्या परिशिष्ट–ब मध्ये दिलेल्या नमुन्यामध्येच विद्यार्थ्यास द्यावे.

MRaut
7.12.23

(मिनाक्षी राऊत)
प्र.विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे–411005.

सोबत–
1) संदर्भिय शासन निणर्याची प्रत व संस्थांची यादी ( पृ.क.1 ते 10 )
2) तसेच परिशिष्ट अ,ब, व हमीपत्र नमुना आणि प्रस्ताव प्रपत्र ( पृ.क. 11 ते 14 )

प्रत माहितीसाठी–
1. विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे–411001.
2. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे/अहमदनगर/सोलापूर

(१)

शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रिडा विभाग

**शासन निर्णय क्रमांक :-संकीर्ण - २०१६ / प्र.क्र. २०२ / एसडी-२**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- २४ नोव्हेंबर, २०१७

संदर्भ:- १) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. एचएससी - १०९७/(१४४४ /९७ ) /उमाशि-१, दिनांक: २६ जून,१९९७

२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. एचएससी - १७०७/(२२२ /०७)/उमाशि-१, दिनांक: २५ मार्च, २०१०

३) शासन शुध्दीपत्र, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. एचएससी - १७०७/(२२२ /०७)/उमाशि-१, दिनांक: ०९ जून, २०१०

४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. एसएससी - २०१२/(१५४ /१२)/उमाशि-२, दिनांक: २१ एप्रिल, २०१५

५) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२०२/एस.डी.२, दिनांक: ०७ जानेवारी, २०१७

६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२०२/एस.डी.२, दिनांक: १४ मार्च, २०१७

७) शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२०२/एस.डी.२, दिनांक: २८ सप्टेंबर,२०१७

८) शासन निर्णय,पर्यटन व सांस्कतिक कार्य विभाग,क्र-संकीर्ण ८२१७/प्र.क्र.४१/सां.का.४ दिनांक २७ सप्टेंबर,२०१७

प्रस्तावना:-

संदर्भाधीन शासन निर्णय क्र.२ अन्वये इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश देताना कला व क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे २ व ३ टक्के जागा राखीव ठेवण्याबाबत शासनाने धोरण निश्चित केले आहे. संदर्भाधीन शासन निर्णय क्र.४ नुसार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी ) परीक्षेत प्रविष्ठ होणाऱ्या राज्य, राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय पातळीवर सहभागी झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची सुधारीत कार्यपध्दतीबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

क्रीडा क्षेत्रासोबतच कला,चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कलेचा उपयोग त्यांच्या भविष्याच्या प्रगतीपटासाठी होणे आवश्यक आहे. तसेच, लोककला हे समाज प्रबोधनाचे माध्यम आहे. लोककलेची वाढ व संवर्धन करण्याचे काम अनेक शालेय विद्यार्थी करीत असतात. अशा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी ) परीक्षेमध्ये क्रीडा गुणांच्या धर्तीवर शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याची कार्यपध्दती संदर्भाधिन दि. ०७ जानेवारी, २०१७, दि.१४ मार्च, २०१७ व दि.२८ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली आहे. याबाबतची अंमलबजावणी सन २०१६-१७ पासून करण्यात आली आहे. तथापि, यामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत निर्गमित करण्यात आलेले दि. ०७ जानेवारी, २०१७, दि. १४ मार्च, २०१७ व दि. २८ सप्टेंबर, २०१७ चे शासन निर्णय या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात येत आहेत.

२. शैक्षणिक वर्ष सन २०१७-१८ पासून शास्त्रीय कला,चित्रकला या क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी ) परीक्षेमध्ये पुढीलप्रमाणे अतिरिक्त गुणाची सवलत देण्यात येईल.

२.१) शास्त्रीय कला :-

२.१.१) शास्त्रीय नृत्य,गायन व वादन यामध्ये ज्या विद्यार्थ्याने मान्यताप्राप्त संस्थेतेच्या सलग ३ परिक्षा अथवा ५ परिक्षा दिल्या असेल त्या विद्यार्थ्यांना त्याचे शासकीय नृत्य, गायन व वादन या कलेमधील गुण व यानुसार द्यावयाची ग्रेड यानुसार खालीलप्रमाणे सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यात यावे.

| गुण | ग्रेड | कमाल गुण | |
|---|---|---|---|
| | | ३ री परिक्षा | ५ वी परिक्षा |
| ७५% व त्यापेक्षा जास्त | A+ | १० | १५ |
| ६५% व त्यापेक्षा जास्त आणि ७५% पेक्षा कमी | A | | |
| ५५% व त्यापेक्षा जास्त आणि ६५% पेक्षा कमी | B+ | ०७ | १० |
| ४५% व त्यापेक्षा जास्त आणि ५५% पेक्षा कमी | B | ०५ | ०५ |
| ४५% पेक्षा कमी | C | ०३ | ०३ |

२.१.२) पाश्चात्य नृत्याकरिता सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यात येणार नाहीत.

२.१.३) शास्त्रीय कला क्षेत्रातील विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण देण्यासाठी ग्राह्य धरण्यात येईल अशा संस्थांची सन २०१७-१८ करिताची यादी सांस्कृतीक कार्य विभागाने संदर्भाधिन दि.२७ सप्टेंबर,२०१७ च्या शासन निर्णयान्वये जाहिर केली आहे. सदर संस्था खालील अटींची पूर्तता करतात.

अ. सदर संस्थेची नोंदणी धर्मादाय आयुक्तांकडे झालेली असून नोंदणी करुन ५ वर्ष पेक्षा जास्त कालावधी झाला असावा.

ब. संस्थेकडे मागील ३ वर्षाचा लेखा अहवाल असावा.

सन २०१८-१९ पासून वरील प्रमाणे निकष पूर्ण करणाऱ्या संस्थांना सांस्कृतिक कार्य विभागामार्फत मान्यता देण्यात यावी. सांस्कृतिक कार्य विभाग याबाबतची जाहिरात प्रसिद्ध करून संस्था नोंदणी करणासाठी विहित कालावधी निश्चित करेल. सदर कालावधीत संस्थाना नोंदणी करणे आवश्यक राहील.

२.१.४) ज्या संस्थांची नोंदणी सांस्कृतिक कार्य विभागाकडे असेल, त्या संस्थेचे प्रमाणपत्र विद्यार्थ्याने प्राप्त केलेले असल्यास विद्यार्थी ज्या शाळेत इ.१० वी शिकत आहे, त्या शाळेच्या मुख्यध्यापक/प्राचार्यांमार्फत ते तपासून प्रमाणित करण्यात येईल. विद्यार्थ्याने सांस्कृतिक कार्य विभाग

मान्यता प्राप्त संस्थानी आयोजित केलेल्या ३ री किंवा ५ वी परीक्षा विद्यार्थी इ. ७ वी, इ. ८ वी, इ. ९ वी अथवा इ. १० वी मध्ये असताना उत्तीर्ण केलेली असावी. तसेच विद्यार्थ्याने उत्तीर्ण केलेल्या परीक्षांप्रमाणे त्याला अतिरिक्त गुण देण्याची व त्याप्रमाणे राज्य मंडळास कळविण्याची जबाबदारी संबंधित शाळा मुख्याध्यापकांची राहील.

२.१.५) कला क्षेत्रातील कोणत्या प्रकारासाठी (शास्त्रीय गायन/नृत्य/वादन) अतिरिक्त गुण दिले आहेत ते राज्यमंडळाने संबधित विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेमध्ये नमूद करावे.

२.१.६) कला क्षेत्रातील ३ री व ५ वी परिक्षा एकाचवेळी देणारे विद्यार्थी सवलतीचे गुण देण्यासाठी पात्र ठरणार नाहीत.

२.१.७) संबंधित संस्थांना विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देताना त्याची परिक्षानिहाय गुणपत्रिका देणे संस्थावर बंधनकारक राहील. विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये प्रस्ताव सादर करताना प्रमाणपत्रासोबत परिक्षानिहाय गुणपत्रिकाही सादर कराव्या.

२.२) <u>लोककला :-</u>

२.२.१) शासनाने लोककलांना अनुदान देण्याच्या योजनेतंर्गत अनुदान मंजूर करण्याचे निकष सांस्कृतिक कार्य विभागाच्या शासन निर्णय दि.०१ जानेवारी, २००८ अन्वये जाहीर केले आहेत. प्रयोगात्मक लोककला प्रकारात किमान ५० प्रयोग सादर करणाऱ्या संस्थांना / मंडळाना सांस्कृतिक कार्य विभागामार्फत विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र देण्यासाठी मान्यता देण्यात यावी.

२.२.२) सांस्कृतिक कार्य विभाग याबाबतची जाहिरात प्रसिद्ध करून संस्था नोंदणी करणासाठी विहित कालावधी निश्चित करेल. सदर कालावधीत संस्थाना नोंदणी करणे आवश्यक राहील.

२.२.३) सांस्कृतिक कार्य विभागाकडील नोंदणीकृत संस्था / मंडळाचे प्रमाणपत्र कला क्षेत्रातील विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण देण्यासाठी ग्राह्य धरण्यात येईल. अशा संस्था / मंडळाची नोंदणी धर्मादाय आयुक्तांकडे झालेली असणे आवश्यक आहे (धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणीची अट सन २०१८-१९ पासून लागू करण्यात यावी).

२.२.४) अतिरिक्त गुण अनुज्ञेय असणाऱ्या प्रयोगात्मक लोककला प्रकारांची निश्चिती सांस्कृतिक कार्य विभागाने करावी.

२.२.५) इ.७ वी, इ.८वी, ९वी व इ.१० वी या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यास प्रयोगात्मक लोककला प्रकारातील सादरीकरणाबाबत खालील प्रमाणे अतिरिक्त गुण देण्यात यावे.

| प्रयोगांची संख्या | अतिरिक्त गुण |
|---|---|
| २५ पेक्षा जास्त-५० पेक्षा कमी | ५ |
| ५० व त्यापेक्षा जास्त | १० |

लोककला सादरीकरणातील निर्मितीच्या कोणत्याही घटकामध्ये सहभागी असणाऱ्या विद्यार्थ्यास सदरप्रमाणे अतिरिक्त गुण देण्यात यावेत.

२.२.६) इ. ७ वी, इ.८वी, ९वी व इ.१० वी या शैक्षणिक वर्षात राज्य शासनातर्फे राज्यस्तरावर घेण्यात येणाऱ्या बालनाट्य स्पर्धेत वैयक्तिक प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे अतिरिक्त गुण देण्यात यावे.

| क्रमांक | अतिरिक्त गुण |
|---|---|
| प्रथम ( सुवर्ण पदक ) | १५ |
| व्दितीय ( रौप्य पदक ) | १० |
| तृतीय ( कांस्य पदक ) | ५ |

२.२.७) राज्य शासनातर्फे घेण्यात येणाऱ्या बालनाट्य स्पर्धेत विभाग स्तरावर वैयक्तिक प्रथम क्रमांक ( सुवर्ण पदक) मिळवणाऱ्या विद्यार्थ्यास ०५ अतिरिक्त गुण देण्यात येतील.

२.२.८) चित्रपटासाठी राष्ट्रीय स्तरावरील अभिनय पुरस्कार (वैयक्तिक) प्राप्त होणाऱ्या बाल कलाकारास १० अतिरिक्त गुण देण्यात यावे. तसेच चित्रपटासाठी राज्य स्तरावर प्रस्तुत पुरस्कार (वैयक्तिक) प्राप्त होणाऱ्या बाल कलाकारास ०५ अतिरिक्त गुण देण्यात येतील.

२.२.९) भविष्यात लोककला क्षेत्रात काम करणारे अभ्यासक,संस्था व मंडळ यांनी प्रयोगात्मक लोककला संदर्भातील अभ्यासक्रम तयार करावा. सदर अभ्यासक्रम तपासून व प्रमाणीकरण करण्याबाबतची यंत्रणा सांस्कृतिक कार्य विभागाने निश्चित करावी. तसेच याकरिता स्वतंत्र अभ्यास समिती स्थापन करण्यात यावी. सदर अभ्यासक्रमानूसार गुणदान योजना ठरवण्यात येईल.

२.३) <u>चित्रकला :-</u>

२.३.१) इंटरमिजीट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेतील ग्रेड A प्राप्त विद्यार्थ्यांना ७ गुण, ग्रेड B प्राप्त विद्यार्थ्यांना ५ गुण व ग्रेड C प्राप्त विद्यार्थ्यांना ३ गुण देण्यात यावे.

२.३.२) विद्यार्थी इलिमेंटरी परिक्षा उत्तीर्ण असल्याशिवाय इंटरमिजीट ड्रॉईंग ग्रेड परिक्षेचे गुण मिळणार नाही.

३. एखादा विद्यार्थी क्रीडा, शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेतील सहभाग यापैकी एकापेक्षा जास्त क्षेत्रात प्राविण्य प्राप्त करत असला तरी, कोणत्याही एकाच क्षेत्रासाठीचे सवलतीचे अतिरिक्त गुण घेण्यासाठी अर्ज करु शकतो.

४. विद्यार्थ्यांना कला क्षेत्रासाठीचे सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यात येत असल्याने, इयत्ता ११ वी प्रवेश देताना कला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना २% जागा राखीव ठेवण्याची दि.२५ मार्च, २०१० च्या शासन निर्णयान्वये देण्यात येत असलेली सवलत रद्द करण्यात येत आहे.

५. इ १० वी चे निकाल विहित कालावधीत लावणे राज्यमंडळास शक्य व्हावे, यासाठी शाळांकडून सवलतीचे गुण देण्याबाबतचे प्रस्ताव विहित कालावधीत राज्यमंडळाकडे सादर होणे आवश्यक आहे. यासाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक निश्चित करण्यात येत आहे.

| करावयाची कार्यवाही | अंतिम दिनांक |
|---|---|
| विद्यार्थ्यांनी शाळेकडे प्रस्ताव सादर करणे | १५ डिसेंबर |
| शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करणे | १५ जानेवारी |

वरील वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संबंधिताची राहील. संबंधित संस्थांनी वरिल वेळापत्रक विचारात घेवून परिक्षांचे आयोजन, निकाल व प्रमाणपत्र देणे इ. कामे पूर्ण करावी.

६. संबंधित संस्थेने विद्यार्थ्यांस मूळ प्रमाणपत्र संस्थेच्या सही शिक्या सह २ प्रती मध्ये दयावे. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांस पोच दयावी. विद्यार्थ्यांने प्रमाणपत्राची एक प्रत शाळेत मुख्याध्यापकाकडे जमा करुन पोच घेऊन संस्थेंत पोच जमा करावी. संस्थेने विद्यार्थ्यांस सोबतच्या परिशिष्ट-"अ" मध्ये दिलेल्या नमुन्यामध्येच प्रमाणपत्र दयावे. चित्रकलेबाबतचे प्रमाणपत्र सोबतच्या परिशिष्ट-"ब" मध्ये दिलेल्या नमून्यामध्ये विद्यार्थ्यांस दयावे.

७. इ.१० च्या नियमित परिक्षेसाठी प्रविष्ठ होणारा कोणताही विद्यार्थी ( फॉर्म १७ सहित ) या सवलतीच्या अतिरिक्त गुणासाठी पात्र राहील.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२४१३२११८८७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suvarna S Kharat

Digitally signed by Suvarna S Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School And Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a98fe3e5a45c818658168cffd366aced9a44c59607f616a36d403a80e74d0df, cn=Suvarna S Kharat
Date: 2017.11.24 13:24:03 +05'30'

( डॉ.सुवर्णा सि.खरात )
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:-

१) मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव,राजभवन,मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
३) मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग),मंत्रालय,मुंबई.
४) मा. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य विभाग), मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
६) मा. शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) क्रीडा संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
८) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) कला संचालक, कला संचालनालय,मुंबई
१०) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, पुणे.
११) विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ (सर्व).
१२) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१३) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
१४) सर्व शिक्षण निरीक्षक, मुंबई (पूर्व ,पश्चिम, उत्तर)
१५) निवड नस्ती (एसडी – २)

(७)

शासन निर्णय :-

या शासन निर्णयान्वये मार्च, २०२० पासून होणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये (इयत्ता १० वी) विद्यार्थ्यांना वाढीव गुणांची सवलत देण्याकरीता शास्त्रीय संगीत, नृत्य व वादन तसेच लोककला क्षेत्रातील खालील संस्थांची प्रमाणपत्र देण्याकरीता निवड करण्यात येत आहे.

## शास्त्रीय गायन, वादन व नृत्य या क्षेत्रातील संस्था

### तक्ता - अ

| क्र. | संस्थेचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|
| १ | तंजावर नृत्य शाला, वृंदावन, सुभाष रोड, विले-पार्ले, (पुर्व) मुंबई ४०००५७ |
| २ | संगीताचार्य द.वि. काणेबुवा प्रतिष्ठान, ४३/२, ओंकार बेडेकर, गणपती मंदिर, रामबाग कॉलनी, पौड रोड, पुणे ४११ ०३८ |
| ३. | लयशाला नृत्य कला निकेतन, इंद्रप्रस्थ बंगला नं.४, जुनी स्टेट बँक कॉलनी, सावेडी रोड, अहंमदनगर - ४१४ ००३ |
| ४. | नादब्रम्ह संगीत शिक्षण संस्था, कालिका नगर, कालिका मंदिराजवळ, माजलगांव, ता. माजलगांव, जि. बीड ४३१ १३१ |
| ५. | नृत्यांजली नृत्य कला केंद्र, सर्व्हे नं. ३१/१, क्रेन रडार कंपनी समोर, जुना मुंढवा रोड, नगर रोड, जि.पुणे ४११ ०१४ |
| ६. | आलाप बहुउद्देशीय सांस्कृतिक व सामाजिक संस्था, १/२१, नवीन सुभेदार ले-आऊट, बसवेश्वर पुतळयाजवळ, नागपूर - २४ |
| ७. | नृत्यांजली नृत्य संस्था, शिल्प ४७५/१४, सदरबझार, डॉ. तावडे हॉस्पिटलसमोर, सातारा |
| ८. | सुमुखी परफॉर्मिंग आर्टस फौंडेशन, डी/५९, ४ था मजला, हेमराजवाडी, ३१६ ज. शं. रोड, ठाकूरद्वार, मुंबई - ४०० ००२ |
| ९. | संगीत साधना कला सांस्कृतिक व सेवाभावी प्रतिष्ठान, मारवाडी गल्ली, हिंगोली ४३१ ५१३ |
| १०. | कला वैभव शिक्षण संस्था, वैभव कॉलनी, एम. आय. डी. सी. रोड, दस्तुर नगर, अमरावती |
| ११. | महेश्वर डान्स अकॅडमी, ई-२०३, २ रा मजला, धिरज प्रेसीडेंन्सी, एम. जी. रोड, कांदिवली (प), मुंबई ४०० ०६७ |
| १२. | नुपुरा फाईन आर्टस अकॅडमी, डी/००२, शिवम, सेक्टर - व्ही, वसंत नगर, वसई रोड, (ई) पालघर |
| १३. | नटना नृत्य अकॅडमी, आय-२०१, शांती कॉम्प्लेक्स, साकि-विहार रोड, तुंगा, पवई, मुंबई ४०० ०७२ |
| १४. | स्वर साधना संगीत विद्यालय, ७०/२, बी/१, कैलास हाईटस, दत्तनगर किवळे, देहूरोड, पुणे |
| १५. | ओम पूर्णवादी संगीत कला अकादमी, गुरुवाडा, पारनेर, जि. अहमदनगर |
| १६. | नंदकिशोर कल्चरल सोसायटी, सेक्टर २१, यमुनानगर, कै. विमल भास्कर कपोते चौक, माता अमृतानंदमयी मठाजवळ, निगडी, पुणे ४११ ०४४ |
| १७. | श्री संत जगतगुरु तुकाराम महाराज प्रतिष्ठान, शिरसमार्ग, ता. गेवराई, जि. बीड |
| १८. | नृत्यालिका, ई-३/४, अपना घर सोसायटी, मनिषा पार्कच्या मागे, पंप हाऊस, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०६० |
| १९. | जय शिव बहुउद्देशीय शिक्षण मंडळ, द्वारा - विद्यावर्धिनी विद्यालय, मिरकले नगर, अहमदपूर, जि. |

(6)

शास्त्रीय कला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या व लोककला प्रकारात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याकरिता निवड करण्यात आलेल्या संस्थांना मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२१९/प्र. क्र. २८६ /सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १० डिसेंबर, २०१९

वाचा :- १) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एचएससी-१७०७/(२२२/०७)/ उमाशि-१, दिनांक २५ मार्च, २०१०

२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/एसडी २, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७

३) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. सां.का.सं/४९८३, दिनांक ०४ डिसेंबर, २०१९

प्रस्तावना :-

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या उपर्निर्दिष्ट क्र. २ येथील दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या व लोककला प्रकारात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षेत वाढीव गुण देण्याची नवीन कार्यपध्दती निश्चित करण्यात आली असून शास्त्रीय कला क्षेत्र तसेच लोककला क्षेत्रांत सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याकरीता विहित निकष पूर्ण करणा-या संस्थांना दरवर्षी या विभागामार्फत मान्यता देण्यात येते.

२. मार्च, २०२० मध्ये होणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) या परीक्षेत वाढीव गुण देण्याकरिता संस्थांची निवड करण्यासाठी दिनांक १३ नोव्हेंबर, २०१९ रोजी छाननी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता पात्र ठरणा-या संस्थांच्या नावांची शिफारस छाननी समितीने केली. सदर शिफारशीनुसार संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांनी उपर्निर्दिष्ट क्र. ३ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शास्त्रीय कला गायन, वादन व नृत्य क्षेत्रातील संस्थांना तसेच लोककला क्षेत्रातील संस्थांना मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शाखा परीक्षा

| | |
|---|---|
| ४७. | अभिजात नृत्य नाट्य संगीत अकादमी, २, गोशिबा पार्क, डिसुझा कॉलनी, कॉलेज रोड, नाशिक ४२२ ००५ |
| ४८. | श्री वल्लभ संगीतालय, प्लॉट नं. ६, स्वामी वल्लभदास मार्ग, सायन (प), मुंबई ४०० ०२२ |
| ४९. | सांस्कृतिक निकेतन, विवेकानंद एज्युकेशन सोसा., पहिला मजला, ट्रस्ट ऑफिस, सिंधी सोसायटी, चेंबूर, मुंबई ४०० ०७१ |
| ५०. | सरफोजीराजे भोसले, बी. एन. टी. ॲण्ड रीसर्च सेंटर १, माया सी. एच. एस. एल. ५ एम.टी.एन.एल. मार्ग, शिवाजी पार्क, दादर (प), मुंबई. |

## लोककला प्रकारातील संस्था
## तक्ता - ब

| अ.क्र. | संस्थेचे नांव, पत्ता | लोककला प्रकार |
|---|---|---|
| १. | पूर्वी बहुउद्देशीय संस्था, द्वारा विश्वनाथ वाकडे, डॉ. आंबेडकर चौक, पोंभुर्णा वार्ड क्र. ४, जि. चंद्रपूर ४४२ ९१८ | कलापथक, पथनाट्य व लोकनाट्य |
| २. | म. ज्योतिबा फुले शिक्षण कला क्रीडा व आरोग्य बहुउद्देशीय संस्था, उमरा शम. ता. जि. वाशिम | |
| ३. | जागृती फाऊंडेशन, रु. नं. १७ बळवंतनगर, आनंद छाया आ. सातपूर कॉलनी, सातपूर, नाशिक | |
| ४. | श्री. निळकंठेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, प्लॉट नं. ७२, विठ्ठल साई मंदिर जवळ, कारेगांव रोड, लोकमान्य नगर, परभणी ४३१ ४०१ | |
| ५. | गोंधळ सम्राट कै. राजारामबापू कदम सेवाभावी संस्था, गोंधळ सम्राट निवास, जिजामाता रोड, लंगोटे गल्ली, परभणी, ता.जि. परभणी | गोंधळ |
| ६. | रोहिणी लोककला ग्रामीण मंडळ, वझुर, ता. पुर्णा, जि. परभणी | |
| ७. | गणराज थिएटर्स सुरेश धुमाळ आणि पार्टी, मु. ब्राम्हणघर, ता. भोर, जि. पुणे | शाहिरी |
| ८. | ज्ञानसागर शिक्षण संस्था, मु. पो. नागठाणे, ता. जि. सातारा ४१५ ५१९ | पोवाडे, गायन, बतावणी |
| ९. | श्रीराम प्रासदिक भजन मंडळ, मु. गुरवली, पो. खडवली, ता. कल्याण, जि. ठाणे | पोवाडे, भारुड |
| १०. | शिवपार्वती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, शिवसाई ई-७/२, शिवशंकर कॉलनी शिव हनुमान मंदिराशेजारी, जवाहर कॉलनी परिसर, औरंगाबाद | भारुड, पोवाडा व गोंधळ |
| ११. | जय हनुमान शिक्षण संस्था, मु. कुंभारवाडी, पो. माहळमोही, ता. गेवराई, जि. बीड | लावणी, भारुड व गोंधळ |
| १२. | लोकमंगल सर्व सेवा सोसायटी, व्यंकटेश वृंदावन सोसा. प्लॅट नं. बी-३०८, नवले पुलाजवळ, वडगाव (बु.) पुणे | इतर लोककला |
| १३. | मानवसेवा प्रतिष्ठान, मु. पो. गोहोज खुर्द (व्हाया-शिरी), ता. पाथर्डी, जि.अहमदनगर | |
| १४. | स्वप्नील सपना लोककला विकास मंडळ, मानेगाव, ता. माढा, | |

(8)

| | |
|---|---|
| | लातूर - ४१३ ५१५ |
| २०. | कनकलता प्रतिष्ठान, २, प्रकाशदीप अपार्टमेंट, बापा सिताराम मार्ग, हिरावाडी रोड, पंचवटी, नाशिक - ४२२ ००३ |
| २१. | नालंदा डान्स रिसर्च सेंटर, प्लॉट ए-७/१, एन. एस. रोड नं. १०, जे. व्ही. पी. डी. स्कीम, विलेपार्ले (प), मुंबई -४०० ०४९ |
| २२. | कलानंद कथक नृत्य संस्था, २, मातृप्रेम, घारपुरे घाट, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ००२ |
| २३. | कल्पांगण सांस्कृतिक केंद्र, २२/१५३९, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई ४०० ०३३ |
| २४. | नृत्यकला निकेतन, ४/१४, डिंडेसी बिल्डिंग गायवाडी, गिरगांव, मुंबई ४०० ००४ |
| २५. | गरवारे कम्युनिटी सेंटर, एन-७, बी-१, सिडको पोलीस स्टेशन समोर, सिडको, औरंगाबाद - ४३१ ००३ |
| २६. | शिव ओम नृत्य कला केंद्र, पेंटा गॅलक्सी, A – विंग, रो. नं. १०१, फायर ब्रिगेड समोर, एस. एम. रोड, वडाळा (ई), मुंबई ४०० ०३७ |
| २७. | ज्ञानज्योती शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था, गट क्र. २२, किरकटवाडी (कोल्हेवाडी), पुणे २४ |
| २८. | डॉ. कुमार गंधर्व संगीत प्रसारक मंडळ, विठ्ठल नगर (ब), प्रकाश नगर (प), लातूर ४१३ ५१२ |
| २९. | प्राचीन ललित कला प्रबोधिनी, बी-२/१, कुशलपार्क, डावी भुसारी कॉलनी, पौड रोड, कोथरुड, पुणे - ३८ |
| ३०. | आराधना फाईन आर्ट अकॅडमी, जयेश कृपा सोसा. ए/३०६, भागशाळा मैदानाजवळ, कर्वे रोड, डोंबिवली (पश्चिम), जि. ठाणे ४२१ २०२ |
| ३१. | श्री. त्रिमुर्ती संगीत विद्यालय, द्वारा - श्री भास्कर विठ्ठल गुंजाळ, मळावाडी, मु. पो. माणगाव, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग ४१६ ५१९, |
| ३२. | अभिनया इन्स्टीटयुट ऑफ रिसर्च अॅन्ड फाईन आर्टस, एच-०७, जी/२, गितांजली, अंबाडी रोड, वसई (प) |
| ३३. | आर्ट सोसायटी, कोणार्क गार्डन, ई-७, बिबवेवाडी गांव, पुणे - ४११ ०३७ |
| ३४. | द आर्ट अकॅडमी, डी/१७/१३७, एम. आय. जी. कॉलनी, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१ |
| ३५. | संतभुमी कला, क्रीडा प्रतिष्ठान, पाथर्डी, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर |
| ३६. | जय हनुमान शिक्षण संस्था, मु. कुंभारवाडी, पो. माहळमोही, ता. गेवराई, जि. बीड |
| ३७. | नागरी सांस्कृतिक व बहुउद्देशीय संस्था, रामनगर वार्ड नं. १, गोंदिया |
| ३८. | कलाश्री बहुउद्देशीय सेवाभावी अकादमी, सन्मती २६-बी, आदित्यनगर, लक्ष्मी नारायण मंगल केंद्राजवळ, उल्का नगरी, औरंगाबाद - ४३१ ००५ |
| ३९. | ज्ञानज्योत बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, संजय नगर, गल्ली नं. २०, मुकूंदवाडी, औरंगाबाद |
| ४०. | गुरुवर्य पं. शंकरराव वैरागकर सार्वजनिक संगीत सेवा मंडळ, फ्लॅट नं. १०, रामचंद्र कृपा सोसायटी गणेश नगर, सैलानी बाबा स्टॉप जवळ, जेल रोड, नाशिक रोड, ता.जि. नाशिक ४२२ १०१ |
| ४१. | व्हायोलीन अकादमी, ११२, उमाशंकर, सहकार नगर-२, तुळशीबागवाले कॉलनी, पुणे - ४११ ००९ |
| ४२. | स्वप्न कला, ५०२, शिवस्मृती, ना.म. जोशी मार्ग, लोअर परेल (पूर्व), करीरोड नाका, मुंबई - ४०००१३ |
| ४३. | भारतीय संगीत समिती, अ/१५, आनंद बिल्डिंग, एस. व्ही. रोड, मालाड (प), मुंबई - ४०० ०६४ |
| ४४. | श्री संत मोतीराम महाराज सेवाभावी संस्था, ओंकार संगीत महाविद्यालय, जुनी कन्याशाळा भगवती चौक, गंगाखेड, ता. गंगाखेड, जि. परभणी |
| ४५. | श्री संत एकनाथ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, श्रीमती भागीरथीबाई संगीत कला अकादमी, पैठण मु. पो. जायकवाडी, ता. पैठण, जि. औरंगाबाद |
| ४६. | पवार तबला अकादमी, १५७०, कानडे मारुती लेन, नाशिक - ४२२ ००१ |

| | | |
|---|---|---|
| | जि. सोलापूर ४१३ ४१० | |
| १५. | लोकरंग सांस्कृतिक मंच, ठाणे | |
| १६. | साने गुरुजी कला व सांस्कृतिक क्रीडा बहुउद्देशीय मंडळ, श्री कान्होबा चौक, पातुर, ता. पातुर, जि. अकोला | खडीगंमत व शाहिरी |
| १७. | भैरी भवानी परफॉर्मींग आर्टस, २६/२०, एच. आय. जी. कॉलनी, कुर्ला (प), मुंबई ४०० ०७० | प्रयोगात्मक कला व लोकनृत्य |

२. या शासन निर्णयान्वये उपरोक्त तक्ता अ व ब मध्ये निवड करण्यात आलेल्या नोंदणीकृत संस्था मार्च, २०२० मध्ये होणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस (इयत्ता १० वी) बसणा-या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यास पात्र आहेत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९१२१०१५२८२४१९२३. असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित केलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(विलास रा. थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
३. शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
४. उप सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग (सां.का.४), मंत्रालय, मुंबई
५. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे
६. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
७. अध्यक्ष/सचिव, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
८. महासंचालक, महाराष्ट्र राज्य, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई
९. विभागीय अध्यक्ष / सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य (सर्व)
१०. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
११. सर्व शिक्षणाधिकारी, (माध्यमिक)
१२. सर्व शिक्षण निरीक्षक (पूर्व, पश्चिम व उत्तर) मुंबई
१३. नोंदणीसाठी मान्यता देण्यात आलेल्या सर्व संस्था (संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचेमार्फत)
१४. निवड नस्ती (सां.का.४)

शास्त्रीय कला, चित्रकला/लोककला प्रकारात प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांना वाढीव गुणांची सवलत देणेबाबत मुख्याध्यापकांनी विभागीय मंडळाकडे शिफारस करावयाच्या पत्राचा नमूना

जा.क्र.------------------

प्रति, दिनांक----/----/--------

मा.विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे ४.

विषय- कला विषयातील सवलतीचे वाढीव गुण देणेबाबत...

महोदय,

प्रमाणित करण्यात येते की, आमच्या शाळेतील/विद्यालयातील कुमार/कुमारी------------------------------------------------------------------------------ हा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ१०वी) मार्च २०२० बैठक क्रमांक/ आवेदनपत्र क्रमांक ----------------------ने प्रविष्ठ झाला असून, त्याने/तिने खालील कला प्रकारात परीक्षेत प्राविण्य मिळविलेले आहे.

| कला प्रकार | परीक्षा स्पर्धेचे नाव | प्रमाणपत्र देणा-या संस्थेचे नाव व पत्ता | नोंदणी क्रमांक | उत्तीर्ण वर्ष | श्रेणी/क्रमांक | प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| चित्रकला/नृत्य/गायन/वादन/ लोककला प्रकार | | | | | | |

सदर विद्यार्थी/विद्यार्थीनी च्या अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्राची सत्यता पडताळून पाहिलेली आहे. त्यानुसार त्याला/तिला------------------- सवलतीचे वाढीव गुण देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मुख्याध्यापक स्वाक्षरी---------------------

शिक्का, नाव-----------------------------------------

टिप- एखाद्या विद्यार्थी/विद्यार्थीनी एकापेक्षा जास्त कला विषयक परीक्षा यामध्ये किंवा क्रिडा प्रकारांमध्ये प्राविण्य प्राप्त करीत असेल तर एकाच कला/क्रिडा/चित्रकला सवलतीचे वाढीव गुण देण्यास पात्र ठरेल.

## “परिशिष्ट अ -”

संस्थेचे नाव ------------------------------------------------------------------------------------

पत्ता ------------------------------------------------------------------------------------------

सांस्कृतिक कार्य विभाग नोंदणी क्रमांक ------------------ दिनांक --------------------

## प्रमाणपत्र

अ) प्रमाणित करण्यात येते की, कुमार / कुमारी ---------------------------- हा /ही (शास्त्रीय कला प्रकारचे नाव) -------------------------------------- या कला प्रकारातील -----------------------परिक्षा --------गुणांसह (श्रेणी-------) उत्तीर्ण झाला / झाली आहे. सदर परिक्षा उत्तीर्ण होताना तो/ती ----------इयत्तेमध्ये शिक्षण घेत होता / होती.

ब) प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी ----------------------------------- हा / ही मागील ------------ वर्षातील -------------------- या लोककला प्रकारात एकूण -------------प्रयोगात सहभागी झाला / झाली आहे.

सदर विद्यार्थ्यास / विद्यार्थीनीस मार्च ---------- मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी ) परिक्षेत सवलतीचे वाढीव गुण देण्यास पात्र ठरविण्यात येत आहे.

स्थळ :

दिनांक :

अध्यक्ष / सचिव
संबंधित संस्थेचे नाव
(रबरी शिक्क्यासह)

टिप -“अ” किंवा “ब” यापैकी लागू नसेल ते खोडावे.

## "परिशिष्टब -"

दिनांक --------------------

## प्रमाणपत्र

अ) प्रमाणित करण्यात येते की, कुमार / कुमारी ---------------------------- हा /ही इंटरमिजीट ड्राईंग ग्रेड परिक्षा सन -----------मध्ये ------------श्रेणीने उत्तीर्ण झाला / झाली आहे. सदर परिक्षा उत्तीर्ण होताना तो / ती ----------इयत्तेमध्ये शिक्षण घेत होता / होती.

ब) प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी ---------------------------------- हा / ही इलिमेंटरी ड्राईंग ग्रेड परिक्षा सन -----------मध्ये उत्तीर्ण झाला / झाली आहे.

सदर विद्यार्थ्यास / विद्यार्थीनीस मार्च --------- मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी ) परिक्षेत सवलतीचे वाढीव गुण देण्यास पात्र ठरविण्यात येत आहे.

स्थळ :

दिनांक :

संचालक,
कला संचालनालय, मुंबई
(रबरी शिक्क्यासह)

(14)

# ह मी प त्र

शाळा सांकेतांक--------------------

या प्रमाणपत्राव्दारे हमी देतो की, शास्त्रीय कला/चित्रकला बाबतचे मंडळाचे दि.                रोजीचे प्रकटन आम्ही वाचले असून, या विद्यालयामार्फत सादर करण्यात आलेले शास्त्रीय कला/चित्रकला यांचे एकूण................ प्रस्ताव शासन निर्णयानुसार पूर्ण तपासून सादर करण्यात आले आहेत. सदर प्रस्तावामध्ये कुठल्याही प्रकारची त्रुटी नाही. यानंतरही काही त्रुटी अभावी विद्यार्थ्यांस गुण प्राप्त न झाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी विद्यालयाची राहील.

दिनांक

कला/चित्रकला शिक्षक
स्वाक्षरी

मुख्याध्यापक
स्वाक्षरी व शिक्का